# औद्योगिक क्षेत्रात वास्तुशास्त्राचा वाढता प्रभाव

आम्ही उभयतांनी पाच वर्षांपूर्वी योजनाबद्ध रीतीने कामकाज करण्यास सुरुवात केली. विविध प्रदर्शनांच्या माध्यमातून सर्वसामान्यजनांचे घर, कार्यालय, दुकान व कारखाने, हॉटेल, हॉस्पिटल्स या वास्तूंमध्ये विनातोडफोड उपाय योजनांच्या आधारे वास्तुदोष निराकरण या क्षेत्रात घट्ट पाय रोवला. याच दरम्यान सुमारे तीन वर्षांपूर्वी ठाणे, दादर व पुणे येथे वास्तुशास्त्र अभ्यासक्रम वर्ग घेण्यास सुरुवात केली. आजपर्यंत लंडनसहित एकूण बारा बॅचेस यशस्वीरीत्या पूर्ण करून शेकडो व्यक्तींनी वास्तुशास्त्र क्षेत्रात तज्ज्ञ म्हणून यशस्वी कार्य करण्यास सुरुवात केली आहे.



-डॉ. रविराज अहिरराव

**आ**जपासून पाच वर्षांपूर्वी जर कोणी वास्तुशास्त्र मार्गदर्शन व सल्ला या व्यवसायाला सर्व्हिस इंडस्ट्री म्हणून संबोधले असते, तर त्याच्याकडे लोकांनी विक्षिप्त नजरेने पाहिले असते. परंतु आज या क्षेत्राची वाढ, मागणी व काम करणाऱ्या तज्ज्ञ मंडळींची वाढती संख्या पाहिल्यास या व्यवसायाला सर्व्हिस इंडस्ट्री संबोधणे मुळीच गैर ठरणार नाही. कारण वास्तुशास्त्राचे महत्त्व व त्याचा मानवी जीवनावरील प्रभाव याची जाणीव प्रत्येकाला झालेली असल्याने आपली अस्तित्वात असलेली निवासी अथवा व्यावसायिक वास्तू, या शास्त्रानुरूप करून घेण्याकडे सर्वांचा कल वाढत चालला आहे. तसेच एखादी नवी वास्तू घेतानासुद्धा याचा प्रकर्षाने विचार होऊ लागलेला आहे; एवढेच नव्हे, तर अनेक बांधकाम व्यावसायिकांनी आपल्या बांधकाम प्रकल्पांचा आराखडा वास्तुशास्त्रानुरूप करून घेण्यास प्रारंभ केला आहे.

एकंदरीत भारताची लोकसंख्या, त्याअनुसार असलेली कुटुंबांची संख्या व त्यातसुद्धा अनेक कुटुंबांमध्ये एकापेक्षा अनेक वास्तू असण्याची वस्तुस्थिती यामुळे अगदी झोपडीपासून ते आलिशान महालापर्यंत वास्तूंच्या संख्येचा विचार

(पुढील पानावर)



केल्यास ती संख्या ३० ते ४० कोटी असण्याची शक्यता निश्चित आहे व त्या प्रत्येक वास्तूला या शास्त्राची आवश्यकता आहे. तसेच लाखो-करोडोंच्या संख्येत नवीन घरांची निर्मिती होत आहे. याशिवाय औद्योगिक-शैक्षणिक-व्यावसायिक व सामाजिक वापराच्या लाखो वास्तू अस्तित्वात आहेत व त्यात नवीन वास्तूंची भर सतत पडत आहे. या सर्व गोष्टींचा विचार केला तर वास्तुशास्त्र मार्गदर्शन-सल्ला या सर्व्हिस इंडस्ट्रीला किती स्कोप असू शकतो याचा अंदाज आपण करू शकता.

तसेच, आंतरराष्ट्रीय स्तरावरसुद्धा या व्यवसायास फार मोठ्या प्रमाणावर संधी निर्माण करता येऊ शकेल; कारण की, चीनमध्ये विकसित झालेली मूळची भारतीय असलेली फॅंगशुईसारखी विद्या अमेरिकी व युरोपीय लोकांच्या आकर्षक व आक्रमक मार्केटिंग तंत्रामुळे जगभरात सर्वत्र लोकप्रिय ठरली आहे. आपल्या भारतात फूटपाथपासून ते आलिशान गिफ्टशॉपपर्यंत सर्वत्र फॅंगशुईच्या वस्तू विक्रीसाठी दिसतात यावरून आपण अंदाज करू शकतो या क्षेत्रातील उद्योग-व्यवसाय व रोजगार संधींचा.

या सर्व गोष्टींचा संपूर्ण विचार आम्ही उभयतांनी पाच वर्षांपूर्वी केला व त्यातून योजनाबद्ध रीतीने कामकाज करण्यास सुरुवात केली. सर्वप्रथम विविध प्रदर्शनांच्या माध्यमातून सर्वसामान्यजनांचे घर, कार्यालय, दुकान व कारखाने, हॉटेल, हॉस्पिटल्स या वास्तूंमध्ये विनातोडफोड उपाय योजनांच्या आधारे वास्तुदोष निराकरण या क्षेत्रात घट्ट पाय रोवला. याच दरम्यान सुमारे तीन वर्षांपूर्वी ठाणे, दादर व पुणे येथे वास्तुशास्त्र अभ्यासक्रम वर्ग घेण्यास सुरुवात केली. आजपर्यंत लंडनसहित एकूण बारा बॅचेस यशस्वीरीत्या पूर्ण करून शेकडो व्यक्तींनी वास्तुशास्त्र क्षेत्रात तज्ज्ञ म्हणून यशस्वी कार्य करण्यास सुरुवात केली आहे.

मागील दीड वर्षात इंडस्ट्रियल वास्तुशास्त्र व बांधकाम प्रकल्पांना वास्तुमार्गदर्शन या क्षेत्रात योजनापूर्वक पावले टाकून अनेक नामांकित उद्योग व बिल्डर्स आणि डेव्हलपर्स आमचे कायमस्वरूपी ग्राहक झाले आहेत. अनेक सहकारी बँका व विदेशी बँकांसाठी अधिकृत वास्तुतज्ज्ञ म्हणून मान्यता मिळविण्यात यश आले आहे. याचसोबत विदेशात खास करून इंग्लंड व



सौ. मंजुश्री अहिरराव

मॉरिशसमध्ये मोठ्या प्रमाणावर ग्राहकांचा विश्वास संपादन करण्यात यश आले आहे. इंटरनेट व वेबसाईटच्या द्वारे अनेक परदेशस्थ ग्राहकांना मार्गदर्शन देणे अव्याहत चालू आहे. मागील नऊ महिन्यांपासून झी टी. व्ही. मराठीच्या होम स्वीट होम कार्यक्रमाच्या ४५ एपिसोड्सच्या माध्यमातून घराघरात लोकांचा विश्वास संपादन करण्यास आणखीनच मदत झालेली आहे.

आजघडीला १० ते १२ वास्तुतज्ज्ञांचा ताफा सतत कार्यरत राहील अशा पद्धतीने कामकाज वाढविण्यात व मुंबई-पुण्यातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील एकमात्र सर्वात मोठी संस्था (Vastushastra Consultancy House) या दिशेने वाटचाल चालू आहे.

उद्योगधंद्यांत महाराष्ट्र नेहमीच अग्रेसर आहे व अनेक नवीन धडाडीचे उद्योजक या क्षेत्रात बस्तान बसविण्यात व नाव कमाविण्यात कार्यरत आहेत. या सर्वांसाठी एकच महत्त्वाची सूचना करणे आवश्यक आहे की, आपले दुकान, ऑफिस, कारखाना अथवा इतर कुठलाही व्यवसाय चालू करतेवेळी त्याची वास्तुशास्त्रानुसार रचना करणे अतिशय आवश्यक आहे. यामुळे भविष्यात निर्माण होणाऱ्या अनेक संकटांना टाळता येणे शक्य होऊन यशाचा मार्ग निर्वेध करता येतो. माझ्या परीक्षणातील अनेक इंडस्ट्रियल आस्थापनांमध्ये उत्कृष्ट व्यावसायिक संधी उपलब्ध असूनसुद्धा तो व्यवसाय अपयशी ठरला आणि त्याचे मूळ कारण वास्तुशास्त्रच होते. आजसुद्धा कुठल्याही कारखान्याचे अथवा वास्तूचे परीक्षण केल्यास त्यातील रचनेच्या आधारे त्यांना कोणत्या प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागत असेल याची पूर्ण कल्पना देता येते. म्हणून नवीन उद्योजकांनी अथवा अस्तित्वात असलेल्या उद्योगांनी आपल्या उद्योगधंद्याची रचना वास्तुशास्त्रानुसार आहे किंवा नाही याची खात्री करून घेणे म्हणजेच खऱ्या अर्थाने सुख, शांती व समृद्धीची ग्वाही हे लक्षात ठेवावे.

-प्रतिनिधी
४, निळकंठ कृपा, ब्राह्मण सेवा संघ हॉलसमोर, ब्राह्मण सोसायटी, नौपाडा, ठाणे (प.)
फोन : (०२२) २५३९९१८९
www.vasturaviraj.com
E-mail : vasturaviraj.@vsnl.net